# कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब

## रानभाज्या व औषधी वनस्पती महोत्सव

### दिनांक २२ ऑगस्ट, २०१९

२२ ऑगस्ट म्हणजे आमच्या संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. माणिकरावजी ठाकरे यांचा वाढदिवस. या दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्यावतीने या दिवशी एक नाविण्यपूर्ण उपक्रम प्राचार्याच्या मार्गदर्शनात राबविण्यात आला, तो म्हणजे रानभाज्या व औषधी वनस्पती महोत्सवाचे आयोजन. हा महोत्सव दोन टप्प्यात विभागला होता. पहिला टप्पा मार्गदर्शनपर कार्यक्रम आणि दुसरा टप्पा दुर्मिळ रानभाज्यांचे प्रदर्शन. सुरूवातीला मार्गदर्शनपर कार्यक्रमाकरिता विशेष मार्गदर्शक म्हणून इन्नानी महाविद्यालय, कारंजा लाड येथील वनस्पतीशास्त्र तज्ज्ञ डॉ. अशोकराव देवरे, आयुर्वेद महाविद्यालय, यवतमाळ येथील आहारशास्त्र तज्ज्ञ डॉ. पुष्पा वरगंटीवार व औषधीवनस्पती तज्ज्ञ डॉ. सुनिता भावडे यांना पाचारण करण्यात आले होते तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशवराव फाले हे उपस्थित होते.

मार्गदर्शन कार्यक्रमाच्या सुरूवातीला डॉ. वरगंटीवार मॅडम यांनी रानभाज्यांचे आपल्या आहारातील महत्त्व विशद केले. दुर्मिळ होत चाललेल्या आपल्या परसातील भाज्या. त्याला आलेले रासायनिकत्व, त्यामुळे आरोग्यावर होणारा दुष्परिणाम, या गोष्टींचा त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून उहापोह केला. तर डॉ. देवरे सर व डॉ. भावडे मॅडम यांनी अनेक दुर्मिळ वनस्पतीचा मानसाच्या आरोग्याच्या दृष्टीने होणारा उपयोग प्रत्यक्ष कृतीतून विद्यार्थ्यांना दाखविला. अध्यक्षीय समारोपात प्राचार्यानी आपल्या आजुबाजुला अनेक नैसर्गिक भाज्या आणि औषधी वनस्पती आहेत की, ज्याचा वापर आपण आहारात केल्यास अनेक प्रकारची जीवनसत्वे आपल्या शरीराला मिळून आपली प्रतिकार शक्ती वाढू शकते, आपले आरोग्य सुदृढ राहू शकते असा मोलाचा संदेश विद्यार्थ्यांना दिला.

या महोत्सवाचाच्या निमित्ताने अनेक दुर्मिळ वनस्पती व रानभाज्याचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थी, प्राध्यापकवर्ग व गावकरी मंडळी यांच्याकडून अनेक दुर्मिळ रानभाज्या प्रदर्शनामध्ये मांडण्यात आल्या होत्या. यामध्ये प्रामुख्याने अजगंधा, गुंज, गोकर्ण, मुरडशेंग, पांढरा धोतरा, निर्गुडी, हडसन, अशा अनेकविध रानभाज्यांच्या प्रदर्शनांनी महाविद्यालय परिसरातील वातावरण हरितमय झाले होते. मार्गदर्शन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पुनम जाधव, प्रास्ताविक प्रा. डॉ. रामचंद्र बुटले तर आभार प्रा. डॉ. दिपक कुटे यांनी मानले. या महोत्सवाकरिता शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी यांचा उदंड प्रतिसाद लाभला.

**<u>महोत्सवाची छायाचित्रे</u>**








